Enigma on day article

Maharashtra times

27/8/16

असाच होइल. त्यामुळे शिवसेनेबरोबर आमदारांचे म्हणणे आहे.

# पोदारमध्ये 'आक्रमण' 'एनिग्मा२०१६'चे

**अमेय मालशे/आदेश पुरंदरे,**
कॉलेज क्लब रिपोर्टर

'आक्रमण, सावधान, जागते राहो' असे शब्द ऐकले की, इतिहासातील युद्धाची आठवण होते ना? हीच इतिहासातील युद्धाची थीम घेऊन आलाय यंदाचा 'एनिग्मा २०१६'. माटुंग्याच्या आर. ए. पोदार कॉलेजमध्ये गुरुवारपासून 'एनिग्मा' या इंटरकॉलेज फेस्टिवलला जल्लोषात सुरुवात झाली. 'एनिग्मा-दि अनफेअर वॉरफेअर' ही यंदाच्या 'एनिग्मा'ची थीम

महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या फेस्टचा मीडिया पार्टनर आहे.

आज, रविवारपर्यंत चालणाऱ्या फेस्टमध्ये खेळ, संगीत, लिटररी, नाटक, फाइन आर्ट्स आणि नृत्य अशा अनेक एकूण ५० इव्हेंट्सचा समावेश आहे.

## डे वन सुपरहिट

'एनिग्मा २०१६'च्या पहिल्याच दिवशी 'मिस्टर अँड मिसेस एनिग्मा'च्या प्राथमिक फेरीला जोरदार प्रतिसाद मिळाला. त्याचबरोबर पहिल्याच दिवशी निऑन क्रिकेट, फोटो ट्रेझरहंट, बॉलीवूड नाइट हे इव्हेंट उत्साहात पार पडले. विशेष म्हणजे, 'एनिग्मा २०१६'च्या पहिल्याच दिवशी हिंदी आणि मराठी मालिकांमधील कलाकारांनी लावलेल्या हजेरीने टीम एनिग्मा आणि सहभागी स्पर्धकांचा आनंद द्विगुणित झाला. आत्तापर्यंतच्या स्पर्धा आणि इव्हेंट्समध्ये मुंबईतील साठ्ये-डहाणूकर, रुपारेल, सीएचएम, एमसीसी, जोशी-डेकर, झुनझुनवाला, भवन्स, एमडी आणि अशा मुंबईतल्या अनेक नामांकित कॉलेजांच्या टीम्सनी हजेरी लावली. पहिल्या दिवशी ऋतुरंगचा 'स्वरनक्षत्र' हा म्युझिकल इव्हेंट पार पडला. यावेळी परीक्षक म्हणून मराठी संगीतकार कौशल इनामदार, गायिका स्वरांगी मराठे आणि शमिका भिडे आदी उपस्थित होते. सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह आणि टीम एनिग्माचे उत्तम नियोजन यामुळेच यंदाचा 'एनिग्मा' स्पेशल ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.



### जल्लोष ऋतुरंग आणि क्विझर एरीनाचाही !!

दरवर्षीप्रमाणेच यंदाही पोदारचे 'ऋतुरंग' आणि 'क्विझर एरिना' हे दोन इंटरकॉलेज फेस्ट 'एनिग्मा'च्या बरोबरच साजरे होत आहेत. ऋतुरंग हा मराठी इंटरकॉलेज फेस्टिवल असून मायबोलीचे अनेक पैलू या फेस्टच्या दरम्यान उलगडले जातात. तर क्विझर एरिना हा बुद्धिमत्तेवर आधारित फेस्ट असून या फेस्टमध्ये सहभागी टीम्सच्या बुद्धिमत्तेची कसोटी लागते.